महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
पुणे विभागीय मंडळ, पुणे ४११ ००५.

MAHARASHTRA STATE BOARD OF SECONDARY & HIGHER SECONDARY EDUCATION,
PUNE DIVISIONAL BOARD, PUNE - 411005

DIVISIONAL CHAIRMAN
25536722 (OFF)

DIVISIONAL SECRETARY
2536781/82/83/25536712(OFF)

FAX- 020/25536761
E-MAIL sscboardpune@gmail.com

क्रमांक पुविमं/शाखा-ड/2130
दिनांक २६/०२/२०२६
07/03/2026

प्रति,

मुख्याध्यापक,
सर्व अनुदानित / विनाअनुदानित / अंशत: अनुदानित शाळा
जिल्हा - पुणे / अहिल्यानगर / सोलापूर

विषय - माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा फेब्रु.-मार्च २०२६ साठी उत्तरपत्रिका तपासणीच्या कामासाठी इयत्ता १० वी ला शिकवित नसल्याने नियुक्ती रद्द करण्यासंदर्भात पत्र दिलेल्या शिक्षक व मुख्याध्यापकांच्या कामाचे वेळापत्रक मागविणेबाबत.

फेब्रु.-मार्च २०२६ ची माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा दिनांक २०/०३/२०२६ पासून सुरू झाली आहे.

मंडळाकडे प्राप्त झालेल्या पॅनलनुसार शिक्षकांची संख्या कमी असल्याने सर्व शिक्षक व मुख्याध्यापकांना उत्तरपत्रिका तपासणीचे / नियमनाचे काम देण्यात येत आहे.

मंडळाच्या असे निदर्शनास आले आहे की, अनेक शाळांच्या शिक्षक पॅनलवर शिक्षक व मुख्याध्यापकांनी ते इयत्ता १० वी ला शिकवित नसल्याने त्यांची नियुक्ती रद्द करावी असे पॅनलवर नमूद केले आहे तसेच मंडळास पत्र दिलेले आहे.

महाराष्ट्र खाजगी शाळा (सेवाशर्ती) नियमावली १९८१ मधील अनुसुची ज नुसार परीक्षेचे कामकाज हे शिक्षकांच्या कर्तव्याचाच भाग आहे तसेच नियम १२(३) नुसार मुख्याध्यापक / प्राचार्य, उपमुख्याध्यापक / उपप्राचर्य व पर्यवेक्षक यांनी दर आठवड्याला चार ते दहा तास आणि त्यापेक्षा कमी वर्ग असलेल्या शाळेत सहा ते बारा तास काम करणे बंधनकारक असल्याचे शिक्षण संचालनालयाने म्हटले आहे. त्यामुळे मुख्याध्यापक / प्राचार्य, उपमुख्याध्यापक / उपप्राचर्य व पर्यवेक्षक व शिक्षक शिकवित असलेल्या विषयांची माहिती पॅनलवर देणे आवश्यक असून त्याअनुषंगाने उत्तरपत्रिका तपासणीचे कामही बंधनकारक आहे.

तरी शिक्षक पॅनलवर स्वताचे नाव नमूद न केलेल्या तसेच इयत्ता १० वी ला शिकवित नसल्याचे नमूद करून उत्तरपत्रिका तपासणीचे काम रद्द करण्यासंदर्भात पुणे विभागीय मंडळास पत्र दिलेल्या सर्व शिक्षक व मुख्याध्यापकांनी त्यांच्या कामाचे वेळापत्रक तातडीने या कार्यालयास सादर करावे.

Digitally signed by
MINAKSHI BHARAT RAUT
Date: 02-03-2026
16:34:27

(श्रीमती मिनाक्षी राऊत)
प्र.विभागीय सचिव,
पुणे विभागीय मंडळ, पुणे-५

Scanned with OKEN Scanner